**औद्योगिक किंवा वाणिज्यिक प्रयोजनार्थ ग्रामपंचायतीकडून नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत**

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः व्हीपीएम २०१५/ प्र.क्र.३०६/पंरा-४**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
मुंबई ४०० ००१.
तारीख: ११ डिसेंबर, २०१५.

**<u>प्रस्तावना -</u>**

ग्रामीण भागात उत्पादक स्वरुपाच्या विविध सेवा पुरविण्यासाठी उद्योग सुरु करण्यापुर्वी राज्य शासनाच्या विविध यंत्रणांकडून त्या उद्योगास परवानगी देण्यापुर्वी संबंधित यंत्रणांच्या प्रशासकीय विभागांच्या अस्तित्वात असलेल्या अधिनिमय / नियमांतील तरतूदीस अनुसरुन ज्या ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये असा उद्योग सुरु करावयाच्या आहे त्या ग्रामपंचायतींकडून विविध बाबींसाठी नाहरकत दाखले प्राप्त करुन सादर करण्याबाबतची मागणी करण्यात येते. संबंधित ग्रामपंचायतींकडून नाहरकत दाखला / प्रमाणपत्र देण्यास प्रदीर्घ कालावधीचा विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही ठिकाणी एकदा असे नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर ते रद्द करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे. पेसा क्षेत्रातील अधिसूचित ग्रामपंचायतींमध्ये असा उद्योग सुरु करण्यापुर्वी ग्रामसभेची नाहरकत घेण्याबाबतची तरतूद आहे. मात्र अधिसूचित क्षेत्र वगळता इतर क्षेत्रातील ग्रामपंचायतींची परवानगी घेण्याबाबतची तरतूद ग्रामपंचायत अधिनियम किंवा त्याखालील नियमांमध्ये कोणतीही तरतूद नाही. तथापि, इतर प्रशासकीय विभागांच्या कायद्यातील तरतुदीस अनुसरुन ग्रामपंचायतीच्या नाहरकत दाखल्याची मागणी करण्यात येत असल्याने ग्रामीण भागात उद्योग उभारणे सोयीचे होण्यासाठी ग्रामपंचायतींकडून देण्यात येणाऱ्या नाहरकत प्रमाणपत्रांबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक :-**

राज्य शासनाच्या विविध यंत्रणांकडून सर्वसाधारणपणे खालील परवानग्या घेण्याकरीता ग्रामपंचायतींकडून स्वतंत्रपणे नाहरकत प्रमाणपत्राची मागणी करण्यात येते :-

(१) महसूल व वन विभाग - अकृषिक परवानगी व बांधकामास मान्यता घेण्याकरीता, गौण खनिज उत्खननाची परवानगी देण्याकरीता.
(२) प्रदूषण नियंत्रण मंडळ - उद्योगाच्या उभारणीसाठी पर्यावरण व प्रदूषण विषयक परवानगी घेण्याकरीता.
(३) पाणी पुरवठा विभाग - पिण्याच्या पाण्यासाठी पाईपलाईन टाकण्यासाठी परवानगी घेण्याकरीता.
(४) MGL/GAIL कंपनीकडून गॅस पाईपलाईन जाळे उभारण्यासाठी
(५) महावितरण कंपनी - विजेचा वापर, उच्च दाबाच्या वीज वाहिन्या जाळे पसरविण्याकरिता.
(६) जलसंपदा विभाग - पाणी आरक्षित करण्यासाठी.
(७) औद्योगिक इमारत बांधकाम परवानगी घेण्याकरीता

सद्यस्थितीत वरील परवानग्या देण्याकरीता ग्रामपंचायतीच्या नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केल्यानंतर त्याबाबतचा ठराव ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये घेण्यात येतो व त्यानंतर संबंधित उद्योगाकरीता ग्रामपंचायतीकडून नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येते. त्या अनुषंगाने एखादी व्यक्ती संबंधित ग्रामपंचायत क्षेत्राच्या हद्दीमध्ये नवीन उद्योग स्थापन करत असेल किंवा कार्य किंवा सध्या असलेल्या उद्योगाचा विस्तार करण्यात येणार असेल तेव्हा असे उद्योग उभारण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता ग्रामपंचायतीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतीकडून नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

(१) ज्या कायद्यान्वये ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात आलेले आहे त्याच ठिकाणी संबंधित ग्रामपंचायतीकडून नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करावी.

(२) ज्या कायद्यान्वये ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली आहे, त्या कायद्यामध्ये सदरचे नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता काही कालावधी विहित करण्यात आलेला असेल, अशा वेळी संबंधित ग्रामपंचायतीने अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदरचे नाहरकत प्रमाणपत्र उक्त नमूद विहित कालावधीत देणे बंधनकारक राहील. ज्या ठिकाणी असा कालावधी विहित करण्यात आलेला नसेल अशा प्रकरणांमध्ये सदरचे नाहरकत प्रमाणपत्र त्याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० (तीस) कार्यालयीन दिवसांमध्ये उपलब्ध

करुन देण्यात यावे. उक्त नमूद विहित कालावधी किंवा यथास्थिती ३० (तीस) कार्यालयीन दिवसांमध्ये नाहरकत प्रमाणपत्राकरीता अर्ज करणा-या अर्जदारास नाहरकत प्रमाणपत्र दिले गेले नाही तर ते संबंधित ग्रामपंचातीच्या हितास बाधा येणार नाही अशा अटी व शर्तीस अधिन राहून देण्यात आले असे मानण्यात येईल.

(३) संबंधित ग्रामपंचायतीस नाहरकत प्रमाणपत्र नाकारावयाचे असल्यास त्याबाबतची समर्थनीय कारणे नमूद करणे आवश्यक राहील.

(४) एकदा एखाद्या ग्रामपंचायतीने संबंधित अर्जदारास नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर ते कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही.

(५) अधिसूचित क्षेत्रामध्ये उद्योग उभारण्याकरीता नाहकरत प्रमाणपत्राची मागणी करण्यात आल्यास, संबंधित ग्रामपंचायतीकडून नाहरकत प्रमाणपत्र देताना पेसा अधिनियम १९९६ व त्याअंतर्गत ग्रामविकास विभागाने प्रसिध्द केलेल्या पेसा कायदा विषयक नियमांन्वये करण्यात आलेल्या तरतुदींमध्ये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती अनुसरावी.

(६) ग्रामपंचायतीकडून द्यावयाचे नाहरकत प्रमाणपत्र हे ग्रामपंचायतीच्या मान्यतेने ग्रामसचिवाच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येईल.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५१२१११२२७०१६८२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Girish Dinkar Bhalerao

Digitally signed by Girish Dinkar Bhalerao
DN: CN = Girish Dinkar Bhalerao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Reason: I am approving this document
Date: 2015.12.11 17:36:28 +05'30'

**गिरीश भालेराव**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व जिल्हे,

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुतचे परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पंचायत समिती, ग्रामपंचायती यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

**प्रत माहितीसाठी :-**

१) मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव

२) मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव

३) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) विभागीय आयुक्त, पुणे / कोकण / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

५) सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, सर्व जिल्हे

६) कार्यासन अधिकारी, संग्राम कक्ष / संगणक कक्ष, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मुंबई.

७) निवडनस्ती (पं.रा-४), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मुंबई.